॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव- ४२५००१

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001

Grade-B (2.88)
(NAAC Re-Accredited)

P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)

जा.क्र.उमवि/५/नवीन महा.प्रथम संलग्नीकरण मान्यता-१२-१३/३/ ७१३/२०१२ दिनांक : २९.१०.२०१२

प्रति,

मा. अध्यक्ष / संचालक
सातपुडा विकास मंडळ, पाल ता. रावेर जि. जळगांव
पाल, रावेर, जळगांव

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नवीन महाविद्यालयाच्या प्रथम संलग्नीकरणाबाबत**

**संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एन.जी.सी. २०१२/(९१/१२)/मशि-४ दिनांक १५ जून २०१२**

२) विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/५/D.O. ३ / ६२० /२०१२, दि. 30-08-2012

३) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एन.जी.सी. २०१२/(९१/१२)/मशि-४ दिनांक २१ जुलै २०१२

४) उमवि/५/टे.क्र.३/६७७/२०१२ दि. ०१.१०.२०१२

महोदय,

शासनाने उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करणेस मान्यता प्रदान केलेली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने आपल्या नवीन महाविद्यालयासंदर्भात तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारा, प्राप्त आदेशान्वये, संदर्भिय पत्र क्रमांक ०२ अन्वये स्थानिक तपासणी समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर समितीने आपल्या नवीन महाविद्यालयास भेट देवून त्याबाबतचा अहवाल विद्यापीठास सादर केलेला असून सदर अहवालास तसेच संदर्भीय पत्र क्रमांक ०३ अन्वये गठित समितीने केलेल्या शिफारशीस मा. विद्यापरिषदेने वि.प.ठराव क्रमांक १४४/१२ अन्वये मान्यता प्रदान केली असून त्या अनुषंगाने आपल्या नविन महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता प्रथम संलग्नता देण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

तरी उपरोक्त अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, स्थानिक तपासणी समितीने त्यांच्या अहवालात नमूद केलेल्या अटी/त्रुटींची तसेच आपणांस ज्या शासन निर्णयान्वये नवीन महाविद्यालय सुरु करणेस मान्यता प्रदान करण्यांत आलेली आहे त्या शासन निर्णयांतील अटी/त्रुटींची तसेच उपरोक्त संदर्भीय पत्र क्रमांक ०४ अन्वये आपणांस पाठविण्यात आलेल्या शासनाकडील छाननी सीट मध्ये नमूद केलेल्या बाबींची व त्यासाठी गठीत केलेल्या समितीने सूचीत केलेल्या अटी/त्रुटींची तीन महिन्याच्या आंत पूर्तता करण्याच्या अधीन राहून महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ चे कलम ८३(४) नुसार सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद करण्यांत आलेल्या विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषयांसह नवीन महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता प्रथम संलग्नता प्रदान करण्यात येत आहे. <u>आपणांस मान्य केलेल्या विद्यार्थी संख्येएवढेच विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी आपण प्रवेशीत करावयाचे आहेत.</u> आपणांस देण्यांत येत असलेली मान्यता ही एक वर्षाकरीता राहील व सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी. आपणांस विदीत करण्यांत येते की, आपण आपल्या नवीन महाविद्यालयात परिनियम ४१५ (१) नुसार कार्यभारानुसार आवश्यक तेवढ्या नियमित शिक्षकांची नियुक्ती करुन सदर नियुक्तीचे प्रस्ताव विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागास सादर करुन त्यास विद्यापीठाची त्वरीत मान्यता घेण्यांत यावी. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या अध्यादेश १७२(ई) मध्ये नमूद केलेले विविध फंड्स तयार करुन त्याबाबतच्या ठेवी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यांत याव्यात व त्याच्या साक्षांकीत प्रती विद्यापीठास सादर कराव्यात.

<u>संस्थेचे नांव :-</u>

सातपुडा विकास मंडळ, पाल ता. रावेर जि. जळगांव

| Sr. No. | Name of Sanstha | Name of College | Place | Faculty/Courses granted by the concerned authority/Govt. | General Observations/Suggestions/Conditions as mentioned by LIC |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | SATPUDA VIKAS MANDAL,PAL, TAL. RAVER, DIST. JALGAON PAL, RAVER, JALGAON | [N551896] - ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, PAL, TQ.RAVER, DIST. JALGAON Tal.RAVER Dist. JALGAON | PAAL | COMMERCE - B.COM.<br>SCIENCE - B.SC.<br>ARTS - B.A. | **Observations / Suggestions:-**<br><br>1) Regular Principal , Librarian, Sports Director and teachers are not appointed through proper advertisement<br>2) sufficient books are not available<br>3) science laboratories are not well equipped<br><br>**Suggestions:** do the above needful to start First Year , may be conditions verified by one person committee<br><br>**Conditions:-**<br><br>**6.1 :**<br>1) Essential Equipment for Lab worth Rs.1 lakh : place is there but shortening in instruments so, science laboratories should be well equipped<br>**6.2 :**<br>1) Regular Principal, Librarian, Sports Director and Teachers should be appointed through proper advertisement.<br>2)Science laboratories should be well equipped.<br>3)Sufficient books should be purchased. [ No Regular Principal, Librarian, Sports Director and Teachers are appointed. ]<br>**6.3 :**<br>1) Regular Principal, Librarian, Physical Director and teachers should be appointed through proper advertisement<br>**6.4 :**<br>1)sufficient books should be purchased<br>2)Science Laboratories should be well equipped |

तरी वरील तक्त्यातील रकाना क्र. ६ मध्ये नमूद करण्यांत आलेल्या अटी/त्रुटींची तसेच संदर्भिय शासन निर्णयात/पत्रात नमूद केलेल्या अटी/त्रुटींची ०३ महिन्यांच्या आंत पूर्तता करावी व त्या पुष्ठ्यर्थ आवश्यक त्या कागदपत्र/दस्तऐवजांच्या साक्षांकीत प्रती जोडून पूर्तता अहवाल दोन प्रतीत संलग्नता विभागास सादर करावा, ही विनंती. आपणांस असेही कळविण्यांत येते की, विहीत मुदतीत अटी पूर्तता अहवाल सादर न केल्यास आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे पात्रता/परीक्षा अर्ज कोणत्याही सबबीवर स्विकारले जाणार नाहीत व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घेऊन कार्यवाही करण्यांत यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

sd/-

(स.भा.सुरवाडे)
उपकुलसचिव
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१) मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई.

२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे

३) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, आकाशवाणी केंद्राच्या शेजारी, महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण इमारत, पहिला मजला, जळगांव.

४) मा. परिक्षा नियंत्रक, परिक्षा विभाग, उमवि, जळगांव.

५) मा. पध्दती विश्लेषक, संगणक विभाग, परिक्षा विभाग, उमवि, जळगांव.

६) सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता विभाग, उमवि, जळगांव

७) समन्वयक विद्यार्थी सहायता ई सुविधा केंद्र, उमवि, जळगांव

TRUE COPY
ATTESTED BY
Head Master
Madhyamik Ashram School
Mohmandali Tal. Raver Dist. Jalgaon